MHPU180008542022

## निशाणी क्र.२६ वरील आदेश
**(दिनांक ०३.०७.२०२३)**

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.१ व ४ यांनी त्यांना कैफियत व जबाब दाखल करण्यास झालेला १३३ दिवसांचा विलंब माफ करुन दाव्यास कैफियत व जबाब देण्याची परवानगी मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. त्यांचे असे कथन आहे की, वादी यांनी सदरचा दावा या प्रतिवादीसह इतर प्रतिवादींचे विरुध्द फाळणीबारा करुन मिळण्यासाठी व निरंतरच्या मनाईसाठी दाखल केला असुन त्यावर तुर्तातूर्त ताकीदीचा अर्ज दाखल केला आहे. सदरचे प्रतिवादी यांना समन्स बजावणी झालेली आहे. त्यांनी दाव्याच्याकामी कायद्याप्रमाणे मुदतीत कैफियत व जबाब देणे आवश्यक व गरजेचे होते. परंतु दरम्यानच्या काळात प्रतिवादी हे धार्मिक कार्यानिमित्त देवदर्शनासाठी बाहेर गेलेले होते. तदनंतर ते आजारी असल्यामुळे दाव्याच्या कामी हजर राहता आले नाही. त्यांना दाव्यास कैफियत व मनाई अर्जास म्हणणे देण्यास एकुण १३३ दिवसांचा उशीर झालेला आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी वादींचा दावा फेटाळण्याबाबत सी.पी.सी. आदेश ७ नियम ११ प्रमाणे कोर्टात अर्ज केलेला होता. सदर प्रतिवादींविरुध्द कोणताही नोसेचा आदेश झालेला नाही. दाव्याचे कामकाज गुणदोषावर चालविणे न्यायनिर्णय करण्याकामी प्रतिवादींची कैफियत व जबाब घेणे आवश्यक व गरजेचे आहे. तसे झाल्यास न्यायनिर्णय देण्यास अडचण निर्माण होणार नाही. तसेच प्रतिवादी यांच्या हक्कावर गदा येऊन त्यांचेवर अन्याय होणार नाही. प्रतिवादींनी जाणुनबूजुन कैफियत व जबाब देण्यास टाळाटाळ अगर निष्काळजीपणा केलेला नाही. या सर्व कारणास्तव त्यांनी त्यांचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जास जोरदार विरोध करुन त्यांचा जबाब अर्जावर लिहुन दिलेला आहे. त्यांनी प्रतिवादीची कथने नाकारली आहेत. त्यांचे असे कथन आहे की, अर्जात नमुद कारण हे खरे व बरोबर नाही. अर्जासोबत वैद्यकीय प्रमाणपत्र जोडले नाही. अर्जात नमुद १३३ दिवसांचा उशीर झालेला आहे हे कथन खरे व बरोबर नाही. जादा दिवसांचा विलंब झालेला आहे. विलंबाचे योग्य वास्तव कारण अर्जात नमुद नाही. केवळ प्रकरण लांबविण्यासाठी अर्ज केलेला दिसतो. त्यामुळे अर्ज रद्द होण्यास पात्र आहे. प्रतिवादी यांचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

४. अर्ज व जबाब वाचला. प्रतिवादी क्र. १ व ४ यांचेतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.आर.एस. घोगरे व वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.एस.एन.कामत यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

५. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दि. ३०.०४.२०२२ रोजी प्रतिवादी क्र. १ ते १० विरुध्द वाटप, फाळणीबारा करुन मिळणेबाबत व निरंतर मनाईकरीता दावा दाखल केला. दाव्यास दि. ०५.०५.२०२२ रोजी क्रमांक पडला व त्याचदिवशी माझे पुर्वाधिकारी यांनी प्रतिवादी क्र. ३ हे अज्ञान असल्यामुळे त्यांच्यातर्फे पालक म्हणुन कोणाची नेमणुक केली नसल्यामुळे वादींना त्याबाबत पुर्तता करण्याचे आदेश दिलेत. दि. ०६.०५.२०२२ रोजी वादीतर्फे पालक नेमणुकीचा अर्ज दाखल करण्यात आला. त्यावर पालक सौ. मंदा एकनाथ शेलार यांना नोटीस काढण्याचे आदेश माझे पुर्वाधिकारी यांनी केलेले आहे. प्रतिवादी क्र. २, ५ ते १० यांना नि. १२ बेलिफ अहवालानुसार समन्सची बजावणी होऊनही ते गैरहजर राहिलेत. म्हणुन त्यांच्याविरुध्द मी दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश दि. २१.०७.२०२२ रोजी केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ व ४ हे दि. २०.०६.२०२२ रोजी त्यांच्या विधीज्ञांमार्फत नि. १४ अन्वये हजर झाले. दि. १०.०८.२०२२ रोजी प्रतिवादी क्र. १ यांना दावा फेटाळण्यात यावा म्हणुन सी.पी.सी.आदेश ७ नियम ११ प्रमाणे नि. १८ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. त्या अर्जास वादीने दि. ०१.०९.२०२२ रोजी नि. २२ अन्वये जबाब दाखल केला. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ ने नि. १८ वरील अर्ज मागे घेतलेला आहे. वादीने नि. २३ अन्वये कोर्ट कमिशनरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यानंतर प्रस्तुत अर्ज दि. १६.०१.२०२३ रोजी प्रतिवादींनी दाखल केला आहे. दि. ०८.०६.२०२२ रोजी प्रतिवादी क्र. १ व ४ तसेच इतर प्रतिवादी यांना समन्सची बजावणी झाल्याचे समन्स व नोटीस अहवाल नि. १२ व १३ वरुन दिसुन येते. त्यानंतर दि. ०८.०९.२०२२ रोजी पावेतो त्यांनी त्यांची कैफियत व जबाब दाखल करणे

आवश्यक होते. ४ महिने व ८ दिवसांचा विलंब झालेला दिसुन येतो. एकुण १३३ दिवसांचा विलंब झालेला दिसुन येतो. अर्जात नमुद कारणांचा विचार करता प्रतिवादी क्र.१ व ४ यांची विनंती मान्य केल्यास कोणत्याही प्रकारची बाधा राहणार नाही. प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास मुळ दावा गुणदोषावर निकाली काढता येईल. या सर्व कारणास्तव प्रतिवादी क्र.१ व ४ यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यास पात्र आहे. करिता मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र.१ व ४ यांचा अर्ज नि.क्र.२६ हा वादी यांना रु.३०००/- (प्रत्येक प्रतिवादीने र.रु. १५००/- प्रमाणे वादीस द्यावे) खर्च म्हणुन पुढील तारखेपर्यंत देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.१ व ४ यांनी वादीस दिल्यानंतर त्यांना कैफियत व जबाब दाखल करण्यास झालेला १३३ दिवसांचा विलंब माफ करण्यात येईल. त्यानंतर त्यांना त्यांची कैफियत व जबाब दाखल करण्यास परवानगी देण्यात येईल.

३. प्रतिवादी क्र.१ व ४ यांनी वर नमुद मुदतीत खर्चाची रक्कम दिली नाही तर सदरचा अर्ज नामंजुर झाला असे समजण्यात येईल याची प्रतिवादी क्र.१ व ४ व त्यांच्या विधीज्ञांनी नोंद घ्यावी.

JYOTI BHARAT GOYAL
Digitally signed by JYOTI BHARAT GOYAL
Date: 2023.07.03 17:16:59 +0530

दौंड
दि.०३.०७.२०२३

(श्रीमती. जे.एस.खेडकर-गोयल)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दौंड
ता.दौंड, जि. पुणे

## :: CERTIFICATE ::

*I affirm that the contents of this P. D. F. file of Order are same word to word, as per original Order.*

| | | |
|---|---|---|
| *Name of Stenographer* | : | *Pankaj D. Jagatap,* |
| *Name of Court* | : | *Smt. J. S. Khedkar-Goyal,*<br>*C.J.J.D. & J.M.F.C., Daund, Tal. Daund, Dist. Pune.* |
| *Order Date* | : | *03.07.2023.* |
| *Order signed by Presiding Officer on* | : | *03.07.2023.* |
| *Order uploaded on* | : | *03.07.2023.* |